पुढारी MY कोल्हापूर मंगळवार, ११ ऑगस्ट २०२६

# पुस्तके माणसाचे जीवन समृद्ध करतात : डॉ. हुजरे

**कोल्हापूर : पुढारी वृत्तसेवा**

पुस्तके वाचल्याने माणसाचे जीवन समृद्ध होते, असे प्रतिपादन विवेकानंद कॉलेजचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे यांनी केले. शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे यांच्या ३९ व्या स्मृतिदिनानिमित्त ग्रंथालयाच्या वतीने आयोजित ग्रंथप्रदर्शनात ते प्रमुख पाहुणे म्हणून बोलत होते. ग्रंथ प्रदर्शनात शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे, सुशीलादेवी साळुंखे, राजर्षी शाहू महाराज, साने गुरुजी, महात्मा गांधी यांच्या जीवनावर आधारित ग्रंथ मांडले होते. प्रास्ताविक ग्रंथपाल डॉ. नीता पाटील यांनी केले. सहायक ग्रंथपाल हितेंद्र साळुंखे यांनी आभार मानले. यावेळी डॉ. राजश्री पाटील, प्रा. वर्षा शिंदे, डॉ. संदीप पाटील व प्राध्यापक, विद्यार्थी उपस्थित होते.

11/8/26

तरुण भारत मंगळवार, दि. ११ ऑगस्ट २०२६

# सागर इंगोले यांना पीएच. डी.

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील भौतिकशास्त्र विभागाचा संशोधक विद्यार्थी सागर सुधाकर इंगोले यांना शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूरची भौतिकशास्त्र विषयातील पीएच.डी. पदवी प्राप्त झाली आहे. त्यांचा पीएचडी प्रबंधाचा विषय 'फॅब्रिकेशन ऑफ ट्रान्सपरंट सिलिका बेस्ड सेल्फ–क्लीनिंग सुपरहायड्रोफोबिक कोटिंग्स फॉर सोलर सेल कव्हर ग्लास एप्लिकेशन" होता. या संशोधनासाठी त्यांना विवेकानंद महाविद्यालयाचे डॉ. संजय सुभाष लट्ठे यांचे मार्गदर्शन लाभले. सागर सुधाकर इंगोले यांनी सोलर पॅनेलच्या पृष्ठभागावर सुपरहायड्रोफोबिक गुणधर्म असलेली सिलिका नॅनोपार्टिकलचा वापर करून विशेष कोटिंग्ज विकसित केले. या कोटिंग्जमुळे पृष्ठभागावरील धूळ, घाण व सेंद्रिय प्रदूषके पाण्याच्या साहाय्याने आपोआप दूर होण्यास मदत होते. या संशोधनासाठी त्यांना डॉ. संजय सुभाष लट्ठे यांचे मार्गदर्शन लाभले. सागर इंगोले यांना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. मिलिंद हुजरे, अंतर्गत गुणवत्ता हमी कक्षच्या डॉ. श्रुती जोशी तसेच संस्थेचे कार्याध्यक्ष प्राचार्य अभयकुमार साळुंखे, सीईओ कौस्तुभ गावडे आणि प्रबंधक सचिन धनवडे यांचे मार्गदर्शन लाभले.

11/8/26